# नि. ५ खालील आदेश

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रीया संहिता कलम ३९ नियम १ व अन्वये तात्पुरता मनाई हुकुम मिळणेकरीता दाखल केला आहे. गाव मौजे तळसंदे, ता. हातकणंगले येथील गट नं. २१३ मधील विहिर हा वादाचा विषय आहे. वादीचे थोडक्यात कथन असे की, गट नं. २१३ एकुण क्षेत्र ९० आर ही वादी व प्रतिवादी यांची मिळकत असून प्रतिवादींच्या हिश्शेला ० हे. २२.५ आर. व वादीच्या हिश्श्याला ६७.५ आर अशी जमीन आलेली आहे त्यामध्ये असणारी विहिर ही सामाईक आहे. सदरची मिळकत वादीचे वडील शिवा यांची होती व त्यांचे मृत्युनंतर वादी नं. १ ते ३ व त्यांचा भाउ रंगराव यांचे नांवे झाली व त्यांनी १९८० मध्ये तोंडी वाटप करुन घेतले. त्यांनी वादग्रस्त विहीर ही एकत्रित खोदली परंतू रंगराव हा मोठा भाउ असल्याने विहिर त्याचे नांवे नोंद केली. परंतू त्याचा सर्व खर्च व मोटर व पाईपलाईनचा खर्च वादी आणि मयत रंगराव यांनी केलेला आहे. त्यामध्ये वादी ही प्रत्येकी १/४ हिश्श्याने पाणी घेत आहेत. अशा परिस्थितीत प्रतिवादींनी दि. २१/५/२०१२ रोजी वादींना पाणी घेण्यास अडथळा केला. त्यामुळे वादींनी दि. २१/५/२०१२ रोजी जिल्हा पोलीस प्रमुख व वडगांव पोलीस स्टेशन तक्रार दिली आहे. त्यानंतर दि. १४/८/२०१२ रोजी प्रतिवादींनी वादींना प्रतिबंध केला व पेटीस कुलूप लावले आणि पाण्याचा उपसा करु दिलेला नाही म्हणून वादींनी प्रस्तुतचा दावा दाखल केला असून मनाई देण्याची विनंती केली आहे.

२. प्रतिवादी नं. १ ते ३ यांनी नि. १३ वर लेखी जबाब देऊन वादीचे कथन नाकारलेले आहे. वादींनी प्रतिवादीविरुध्द् दि. २१/५/२०१२ रोजी खोटी तक्रार दिलेली आहे. वादग्रस्त विहिर ही प्रतिवादींचे पूर्वहक्कदार रंगराव कांबळे यांनी १९९१ साली खोदली असून त्याकरीता जिवनधारा योजनेचे रु. २५,०००/-

अनुदान दिलेले आहे व त्यावर इलेक्ट्रीक मोटर १९९२ साली बसविलेली आहे. तसेच मे-२०१२ मध्ये विहीरीतील गाळ काढून खुदाई केलेली आहे. त्यामुळे वादींचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. वादीचे वकील श्री. पी.व्ही. कुलकर्णी व प्रतिवादींतर्फे वकील श्री. सी.एस. शिखरे यांचा युक्तीवाद ऐकला. वादीचे अभिकथन व युक्तीवाद विचारात घेता पुढील मुद्दे अवलोकनार्थ काढून त्यावर माझा निष्कर्ष मी सकारण नोंदवित आहे -

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. वादीने सकृत दर्शनी केस त्याचे बाजूने आहे हे सिध्द केले का ? | नकारार्थी. |
| २. न्यायतत्वाचे संतुलन वादीचे बाजूने आहे हे वादीने सिध्द केले काय? | नकारार्थी. |
| ३. तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास वादीचे अपरीमीत असे नुकसान होईल का ? | नकारार्थी |
| ४. काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारण मिमांसा

**मुद्दा नं. १ बाबत :**

४. वादीने वादग्रस्त विहिर ही सामाईक असल्याचे नमुद केले आहे व वादी नं. १ ते ३ यांना प्रत्येकी २२.५ आर आणि प्रतिवादींना २२.५ आर इतके क्षेत्र सन १९८० मध्येच वाटून घेतलेले आहे तसेच सदर विहिर ही प्रतिवादी नं.

१ चे पती रंगराव यांच्या नांवे काढली होती परंतू त्यासाठी सर्व पैसे वादीने दिले होते तसेच पाईपलाईन व मोटारचा खर्च व वेळोवेळी आलेली बिले वादीने दिलेली आहेत असे नमुद केले आहे. वादी नं. १ ते ३ यांनी त्याबाबत स्वत:ची प्रतिज्ञापत्रे दाखल केलेली आहेत. प्रतिवादींनी वादग्रस्त विहिर ही सामाईक नसून प्रतिवादी नं. १ चे पती रंगराव यांच्या मालकीची होती व त्यांच्या मुत्युनंतर प्रतिवादी नं. १ ते ३ यांच्या मालकीची आहे. वादीने गट नं. २१३ चा सातबारा उतारा दाखल केला आहे. त्यामध्ये वादी नं. १ ते ३ यांचा प्रत्येकी १/४ हिस्सा व प्रतिवादीचे पूर्वहक्कदार रंगराव यांचा १/४ हिस्सा असल्याचे नमुद आहे. वादींनी वादग्रस्त विहिर ही सामाईक असल्याचे सांगीतले असले तरीही ती विहिर १९८० पूर्वी अस्तित्वात नव्हती. सन १९८० मध्ये त्यांचे तोंडी वाटप होवून गट नं. २१३ मध्ये प्रत्येकी २२.५ आर. क्षेत्र वाटून घेतलेले आहे. यावरुन सन १९८० नंतर गट नं. २१३ मधील जमीन ही वादी व प्रतिवादी हे स्वत:चे हिश्शेची वेगवेगळी वहिवाट करतात. प्रतिवादीने नि. १५ सोबत सदरची विहिर ही जिवनधारा योजनेअंतर्गत मयत रंगराव याला मंजूर झाली होती व त्या योजनेअंतर्गत त्याने खोदून घेतलेली आहे. त्याबाबत पंचायत समीती कार्यालय हातकणंगले यांचे पत्र, मा. गावकामगार तलाठी, तळसंदे यांचा दाखला असे कागदपत्र दाखल केलेले आहेत व सदरची विहिर ही प्रतिवादी नं. १ चे पती व प्रतिवादी नं. २ व ३ चे वडील रंगराव यांनी १९९१ मध्ये खोदलेली आहे असे प्रथमदर्शनी दिसून येते. सन १९९१ मध्ये वादी व मयत रंगराव हे एकत्र कुटुंबात रहात नव्हते व त्यांच्या जमीनीची वहिवाट देखील सामाईक नव्हती त्यामुळे सदरची विहिर ही सामाईक आहे हे वादीचे कथन प्रथमदर्शनी बरोबर वाटत नाही. विहिरीचे खोदकाम करण्याकरीता येणारा खर्च वादीने दिलेला आहे असे वादी सांगत असले तरी त्याबाबत सकृतदर्शनी कागदोपत्री

पुरावा पटलावर दिसून येत नाही. प्रतिवादीने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन सदरची विहिर मयत रंगराव यांनी खोदल्याचे दिसून येते. प्रतिवादींनी नि. १५ सोबत दि. ३०/५/२०१२ इ. रोजीचे करारपत्र दाखल केलेले आहे. सदर करारपत्रानुसार प्रतिवादी नं. २ व ३ यांनी प्रभाकर शेटे व सरदार पोवाळकर यांना वादग्रस्त विहिरीतील गाळ काढण्याचे काम दिल्याचे दिसून येते. यावरुन वादग्रस्त विहिर ही प्रतिवादींच्या मालकीची असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामध्ये वादीचा हिस्सा असल्याचे व सदर विहिर सामाईक असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. यास्तव वादीला प्रथमदर्शनी केस नाही या निष्कर्षाप्रत मी आलो आहे. सबब मुदद्ा क्र. १ नकारार्थी नोंदवत आहे.

**मुदद्ा क्र. २ बाबत**

५. वादग्रस्त विहिर ही सामाईक असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही त्यामुळे सदर विहिरीमधून पाणी घेण्याचा वादींना हक्क आहे हे वादींचे कथन योग्य वाटत नाही. त्यामुळे प्रतिवादीविरुध्द् मनाई देण्यासारखी परिस्थिती दिसून येत नाही. सबब, न्यायाचे संतुलन वादीच्या बाजूने नाही या निष्कर्षास मी आलो आहे म्हणून मुदद्ा क्र. २ नकारार्थी नोंदवत आहे.

**मुदद्ा क्र. ३ बाबत**

६. वादग्रस्त विहिरीमध्ये वादींचा सामाईक हिस्सा असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. त्यामुळे मनाई आदेश दिल्यास वादींच्या हक्कास बाधा निर्माण होत नाही म्हणून वादींचे नुकसान होण्याची शक्यता नाही. उलटपक्षी मनाई आदेश दिल्यास प्रतिवादींना त्यांच्या मालकीच्या विहिरीतील पाण्याचा वापर करण्यावर प्रतिबंध निर्माण होवू शकतो त्यामुळे प्रतिवादींचे नुकसान होण्याची शक्यता आहे. सबब मी मुदद्ा क्र. ३ नकारार्थी नोंदवत आहे.

१३. वरील सर्व कारणांचा व विवेचनांचा विचार करता माझे असे मत आहे की, प्रतिवार्दी विरूध्द मनाई आदेश मिळण्यास वादी पात्र नाही. सबब, मी पुढील आदेश पारीत करीत आहे -

## **आ दे श**

१. वादीचा नि. ५ चा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. नि. ५ वर पारित करण्यात आलेला दि. २४/०८/२०१२ रोजीचा आदेश रदद् करण्यात येत आहे.

३. खर्चाचा परिव्यय हा अंतिम निकालास अधिन राहून असेल.

सही/-

दि. १८.०९.२०१२

**(मा.ये.वाघ)**
सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर ,
पेठ वडगांव.